# टँकरमधून 160 लिटर दूध चोरत पाणी भरले!

## चालक, क्लीनरसह चौघांवर मालाडमध्ये गुन्हा दाखल

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी



दुधाच्या टँकरमधील १६० लिटर म्हशीच्या दुधाची चोरी करून पाणी भरल्याचा धक्कादायक प्रकार मालाड परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी दिंडोशी पोलिसांनी जंगबहादूर राजभर (४२) आणि सुरेंद्र राजभर (४६) या टँकर चालकासह, क्लीनर आकाश यादव (२२) व राजेश यादव (४८) तसेच त्यांच्या साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार तेजप्रताप सिंह (४०, रा. मालाड पश्चिम) यांचा होलसेल दूध विक्रीचा धंदा आहे. त्यांच्या डेअरीमध्ये मध्य प्रदेश मधून होलसेल किमतीत म्हशीचे दूध येते. ते आधी वसईत पुरवले जाते. त्यानंतर सिंह यांच्या मालकीच्या दोन टँकरमधून ते शहरातील ठिकठिकाणच्या दूध डेअरीवर पाठवतात. या दोन्ही टँकरवर आरोपी काम करतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून मध्य प्रदेशमधील प्रकल्पातून पाठवलेल्या दुधापेक्षा कमी दूध वसईतून येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यामुळे त्यांनी दोन्ही टँकरचे जीपीएस लोकेशन तपासले जे मालाड पूर्वेकडील दत्त मंदिर येथे दाखवले जात होते. मात्र, तेथे त्यांच्या डेअरीची कोणतीही शाखा नव्हती. त्यामुळे संशय आल्याने त्यांनी या प्रकरणाची पडताळणी सुरू केली.


४ आणि ५ जून रोजी वसईतून दूध घेऊन निघाल्यानंतर जंगबहादूर आणि आकाश यांनी भारत दुग्धालय येथे १६० लिटर दूध पुरवत त्यात तितक्याच मापाचे पाणी मिसळल्याचे तक्रारदार तेजप्रताप सिंह यांना समजले.

त्यानुसार सिंह यांनी पडताळणी केली. त्यावेळी ते जंगहादूर आणि आकाश यांना काही बोलले नाहीत. मात्र, ६ जून रोजी सुरेंद्र आणि राजेश यांनीही वसईतून टँकरने आणलेले दूध भारत दुग्धालय येथे चोरीने पुरवले असता त्यांना सिंह यांनी रंगेहात पकडत चोरीचा जाब विचारला.

त्यावर दोघांनीही उडवाउडवीची उत्तरे दिली. अखेर सिंह त्यांना थेट दिंडोशी पोलिस ठाण्यात घेऊन गेले. तेथे त्यांनी त्यांच्याविरोधात फिर्याद दिली. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

# मुंबई-पुणे मिसिंग लिंकला डिसेंबरचा मुहूर्त

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती






मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरील बोरघाटात वाहतुक कोंडी आणि अपघात होतात. तसेच, पावसाळ्यात येथे दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीला अडथळे येतात. हे लक्षात घेऊन एक-सप्रेस वेवर मिसिंग लिंक ही नवीमार्गिका होत आहे. ही मार्गीका ऑगस्ट २०२५ अखेर खुली करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु नव्याने समोर आलेल्या माहितीनुसार सर्व कामे पूर्ण होऊन डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत मिसिंग लिंक मार्गिका खुली केली जाण्याची शक्यता आहे.

एमएसआरडीसीची प्रकल्प आढावा बैठक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली. त्यांनी मुंबई-पुणे मिसिंग लिंक, पुणे रिंग या कामांचा आढावा घेत काही सूचना केल्या आहेत.

एक्सप्रेसवेवरील मिसिंग लिकच्या कामातील व्हर्टिकल ब्रीजचे काम सध्या वेगात सुरू आहे. हे काम अत्यंत अवघड असल्याने ते नियोजनबद्धरित्या पूर्ण करावे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**महामार्ग दहा पदरी करण्याचा प्रस्ताव**

मुंबई - पुणे एक्सप्रेस वेवर होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता हा महामार्ग सहा ऐवजी दहा मार्गिकांचा करण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीच्या विचाराधीन असून फिरायला जाणाऱ्या लोकांना दिलासा देण्यासाठी हे काम करणे गरजेचे असल्याची चर्चा यावेळी करण्यात आली.

# घनकचरा शुल्काबाबत मुंबईकरांची उदासीनता !

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

घनकचरा व्यवस्थापन शुल्क आकारणीस मुंबई पालिकेने स्थगिती दिली आहे. मात्र शुल्क आकारणीबाबत नागरिकांच्या सूचना, हरकतींचे प्रमाण पाहता या शुल्काबाबत मुंबईकरांत कमालीची उदासीनता असल्याचे दिसून आले आहे. या शुल्काबाबत लोकांचे म्हणणे काय आहे, त्यांना हे शुल्क मान्य आहे का की त्यामध्ये काही बदल अपेक्षित आहेत, या अनुषंगाने प्रशासनाने सूचना व हरकती मागवल्या होत्या. मात्र एक कोटी २० लाख लोकसंख्येच्या या शहरातील फक्त दोन हजार ७०० नागरिकांनी आपले मत नोंदवले आहे.

जनतेच्या दबावापोटी नव्हे; तर राजकीय पक्षांच्या दबावापोटी आणि आगामी पालिका निवडणूक लक्षात घेता शुल्कास स्थगिती देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. कचरा शुल्क आकारण्याचा निर्णय पालिकेने जाहीर केला आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी पाऊल टाकले. शुल्क आकारणी करण्यापूर्वी जनतेच्या काही प्रतिक्रिया, सूचना, हरकती जाणून घेण्यासाठी पालिकेने मुंबईकरांना आवाहन केले होते. त्यासंदर्भात मोठ्या संख्येने मुंबईकर आपले मत नोंदवतील, अशी अपेक्षा होती. पण तसे झाले नाही.



**दोन दरवाढींना सामोरे जावे लागणार?**

तूर्तास या शुल्कास स्थगिती मिळाली असली तरी पालिका निवडणुकीनंतर हे शुल्क लागू होईल, असे संकेत आहेत. निवडणुकीनंतर पाणीपट्टी दरवाढीचीही अंमलबजवाणी होण्याची शक्यता आहे. पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव दोन वर्षांपासून तयार आहे. मात्र तो मंजूर झालेला नाही. त्यामुळे निवडणुकीनंतर मुंबईकरांना दोन दरवाढींना सामोरे जावे लागेल, असे स्पष्ट चित्र आहे.

**'त्यामुळे' कचरा शुल्काला स्थगिती**

शुल्क आकारणी करण्याआधी महापालिकेला घनकचरा व्यवस्थापन कायद्यात बदल करणे आवश्यक होते. तत्पूर्वी जनतेच्या सूचना ऐकून घ्याव्या लागतात आणि त्याप्रमाणे आवश्यक काही तरतुदींमध्ये बदल केला जातो.

१ एप्रिल २०२५ रोजी महापालिकेने सुधारित कायद्याचा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध केला होता. कचरा शुल्काची अंमलबजावणी करण्याची तयारी सुरू केली होती. या शुल्कासोबत मालमत्ता करातही वाढ केली. अगोदरच मालमत्ता करवाढीमुळे नागरिकांवर बोजा पडणार आहे, त्यातच कचरा शुल्कामुळे आणखी अतिरिक्त भार पडेल, त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कचरा शुल्कास स्थगिती दिल्याचे स्पष्टीकरण महापालिका प्रशासनाने दिले होते. सध्या सामान्य नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

# मेट्रो वनवर 11 वर्षांत 111 कोटी प्रवासी



मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मुंबईमेट्रो १ मार्गिकेला ११ वर्षे पूर्ण होत असून, या कालावधीत या मेट्रो मार्गिकेवरून १११ कोटी प्रवाशांनी प्रवास केला आहे. मेट्रोच्या १६ गाड्यांच्या माध्यमातून १२ लाख ६६ हजार फेऱ्यांमधून प्रवाशांनी हा प्रवास केला आहे.

या मेट्रोने आतापर्यंतची सर्वाधिक पाच लाख ४७ हजार प्रवासी संख्येचा टप्पा पार केला आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो वन (एमएमओपीएल)कडून देण्यात आली. मेट्रो वन मार्गिका ८ जून २०१४ मध्ये प्रवाशांच्या सेवेत दाखल झाली होती. रविवार, ८ जूनला या मार्गिकेला ११ वर्षे पूर्ण होत आहेत.

रिलायन्स इन्फ्राने पीपीपी तत्त्वावर या मेट्रो मार्गिकेची उभारणी केली होती. या मेट्रोमध्ये रिलायन्सची ७४ टक्के, तर एमएमआरडीएची २६ टक्के भागीदारी आहे. सध्या या मेट्रो मार्गिकेवरून दरदिवशी सरासरी पाच लाख प्रवासी प्रवास करत आहेत.

**घाटकोपर स्थानकातून २९ कोटी प्रवाशांची ये-जा**

मेट्रो १ मार्गिकेवर घोटकोपर स्थानकातून सर्वाधिक २९ कोटी तीन लाख प्रवाशांनी आतापर्यंत प्रवास केला आहे. त्याखालोखाल अंधेरी स्थानकातून २३ कोटी, साकीनाका ११ कोटी, मरोळ नाका नऊ कोटी, चकाला सात कोटी ८० लाख, पश्चिम द्रुतगती मार्ग सहा कोटी सहा लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे. सर्वांत कमी प्रवासी जागृती नगर मेट्रो स्थानकात लाभले असून येथून, आतापर्यंत एक कोटी ८० लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे.

# कर्करोगाच्या निदानासाठी 'टाटा'मध्ये प्रगत तंत्रज्ञान

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

कर्करोगाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी टाटा हॉस्पिटलमध्ये लवकरच अमेरिकेत वापरले जाणारे प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. याद्वारे सुरुवातीच्या टप्प्यातच कर्करोगाचे निदान करता येईल. सीएसआर अंतर्गत टीएमएचला ही आधुनिक तंत्रज्ञानाची डिजिटल अँजिओग्राफी सिस्टम (डीएसए) मिळणार आहे. टाटा रुग्णालयचा पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडियासोबत करार (एमओयू) केला आहे. भारतात, दर एक लाख लोकांपैकी सुमारे 100 जणांना कर्करोगाचे निदान होते. कॅन्सर रजिस्ट्री प्रोग्रामच्या अहवालानुसार, 2020 च्या तुलनेत 2025 मध्ये कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये 12.8 टक्के वाढ होण्याची शक्यता आहे.ही वाढ चिंताजनक असून कर्करोग उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी अचूक निदान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सारख्या उपाययोजना वापर झाला पाहिजे. यासाठीच पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने आशियातील आघाडीच्या कर्करोग उपचार आणि संशोधन संस्थांपैकी एक असलेल्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलला अत्याधुनिक डिजिटल सबट्रॅक्शन अँजिओग्राफी सिस्टम (ऊड-) देणगी म्हणून दिली आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या जागतिक दर्जाच्या कर्करोग उपचारांच्या मोहिमेला मदत होत असल्याने आम्हाला अभिमान आहे. प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाची उपलब्धता हा सर्व रुग्णांसाठी विशेषाधिकार नसून अधिकार असला पाहिजे असे पॉवर डीआयडी कॉर्पोरेशनचे जनरल मॅनेजर हरा प्रसाद पाल यांनी सांगितले. डिजिटल सबट्रॅक्शन अँजिओग्राफी विथ कॉम्प्युटेड टोमोग्राफी (डीएसए) ही एक अत्याधुनिक इमेजिंग सिस्टीम आहे जी रक्तवाहिन्या आणि ट्यूमरच्या उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा योग्य वेळेमध्ये मिळते..कर्करोगाच्या उपचारांसाठी इंटरव्हेंशनल रेडिओलॉजीचा वापर वेगाने वाढत असल्याने, ही प्रगत प्रणाली या रुग्णांचे अचूक निदान आणि उपचार करण्यास मदत होणार आहे.

टाटा हॉस्पिटलच्या रेडिओ डायग्नोसिस विभागाचे प्रमुख डॉ. सुयश कुलकर्णी म्हणाले की, कर्करोगाचे निदान होण्यासाठी साधारणपणे एक ते दोन आठवडे लागतात. यामुळे कर्करोग लवकर ओळखण्यास आणि उपचार सुरू करण्यास मदत होईल. त्याच्या मदतीने अधिकाधिक रुग्णांवर उपचार करता येतील.

मूत्रपिंड, फुफ्फुस, स्तन, ट्यूमर, बालरोग कर्करोगाचे लवकर निदान करण्यासाठी हे तंत्र खूप उपयुक्त ठरेल. डॉक्टर आणि तंत्रज्ञांना या तंत्राचे प्रशिक्षण दिले जाईल. टप्प्याटप्प्याने, कर्करोग निदानात या तंत्राचा वापर केला जाईल.

# भुयारी मेट्रोला ताडपत्रीचा आधार

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

पहिला पावसाने आचार्य अत्रे चौक स्थानकाची दाणादाण उडवल्यानंतर एमएमआरसीएल सावध झाली आहे. भुयारी मेट्रोच्या ज्या प्रवेशद्वारांचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही, त्या ठिकाणी ताडपत्रीचे आच्छादन टाकले जात आहे.

मुंबईत मेच्या अखेरच्या आठवड्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे भुयारी मेट्रोच्या आचार्य अत्रे चौक स्थानकात पाणी शिरले होते. त्यामुळे स्थानकाचे बरेच नुकसान झाले. तसेच मेट्रो प्रशासनाची नाचक्की झाली होती.

बांधकाम सुरू असलेल्या प्रवेशद्वारातून हे पाणी आत शिरले होते. त्यामुळे यापुढे पुन्हा अशी घटना घडू नये, यासाठी बांधकाम सुरू असलेल्या प्रवेशद्वारांना ताडपत्रीने झाकले जात आहे.

# संक्रमण शिबिरातील मुक्काम वाढला तरी भाडेवाढ नाहीच!

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

संक्रमण शिबिरातील रहिवाशांना त्यांच्या हक्काचे घर देण्यात अपयशी ठरलेल्या म्हाडाने आता नवी युक्ती शोधून काढली आहे. संक्रमण शिबिरातील गाळे अपुरे पडत असल्याने अतिधोकादायक इमारतींतील रहिवाशांना दरमहा २० हजार रुपये भाडे दिले जाईल; मात्र भाड्याच्या घरात कितीही वर्षे मुक्काम वाढला तरीही म्हाडाकडून मिळणाऱ्या रकमेत वार्षिक वाढ होणार नाही. त्यामुळे संबंधित ठिकाणचे भाडे दरवर्षी वाढले तर त्याची भरपाई रहिवाशांना स्वत: करावी लागणार आहे.

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे पावसाळापूर्व सर्वेक्षणात ९६ इमारती अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. या अतिधोकादायक इमारतींमध्ये सुमारे २ हजार ४०० रहिवासी वास्तव्यास असून त्यांना तातडीने संक्रमण शिबिरात स्थलांतरित करणे आवश्यक आहे. सध्या मंडळाकडे फक्त ७८६ संक्रमण गाळे उपलब्ध असल्याने सर्व रहिवाशांना त्यात सामावून घेणे शक्य नाही. अशा रहिवाशांनी स्वत:च पर्यायी निवासाची व्यवस्था केल्यास त्यांना दरमहा २० हजार रुपये भाडे दिले जाणार आहे.

आपले अपयश झाकण्यासाठी म्हाडाने बाह्य यंत्रणेद्वारे ४०० गाळे भाड्याने देण्याचे ठरवले आहे. तसेच अतिधोकादायक इमारतींतील जे रहिवासी स्वत:ची पर्यायी व्यवस्था करतील त्यांना दरमहा २० हजार रुपये भाडे दिले जाणार आहे. संक्रमण गाळे वितरीत करावेत किंवा भाडे द्यावे याबाबतचा निर्णय सर्वस्वी मंडळाचे मुख्य अधिकारी घेणार आहेत. भाडे देण्याबाबतचा निर्णय 'म्हाडा'चे उपाध्यक्ष यांनी घेतल्यास प्रति गाळ्याप्रमाणे २० हजार रुपये दरमहा भाडे या रकमेमध्ये कोणत्याही प्रकारची वार्षिक वाढ होणार नाही. भाड्याच्या घरातील मुक्काम किती वर्षे लांबेल याचा पत्ता नसलेल्या रहिवाशांना दरवर्षी भाडेवाढ मिळणार नाही. त्यामुळे संबंधित ठिकाणचे भाडे दरवर्षी वाढले तर त्याची भरपाई रहिवाशांना स्वत: करावी लागणार आहे.




**भाडे देण्याची वेळ का ?**

संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे वास्तव्यास असणाऱ्या रहिवाशांसाठी म्हाडाने बृहतसूची सुरू केली आहे; मात्र बृहतसूचीतील भ्रष्टाचार आणि रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबतची उदासीनता यामुळे अनेक रहिवासी वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरातच राहात आहेत. त्यांना हक्काचे घर देण्यात म्हाडाला अपयश आले आहे. त्यातच संक्रमण शिबिरातील अनेक गाळे परस्पर विकले गेले आहेत. काही गाळ्यांवर घुसखोरांनी ताबा मिळवला आहे. परिणामी, आणखी रहिवाशांना सामावून घेण्याची क्षमता संक्रमण शिबिरांमध्ये नाही.

**व्याज, विलंब आकार नाही**

म्हाडामार्फत रहिवाशांना कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा विलंब आकार देय नसेल. तसेच भाडेशुल्काच्या सुविधेचा लाभ घेणाऱ्या रहिवाशांना उपमुख्य अधिकारी/संक्रमण गाळे विभाग यांच्यासमवेत करारनामा करणे बंधनकारक आहे. करारनाम्याचा खर्च रहिवाशांना करावा लागेल.

# नितेशने जपून बोलावे

## निलेश राणेंचे ट्विट चर्चेत

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

मंत्री नितेश राणे यांनी धाराशिवमध्ये भाजप कार्यकर्ता मेळाव्यातून शिंदेच्या शिवसेनेला इशारा दिला. 'सगळयांचा बाप म्हणून भाजपचा मुख्यमंत्री बसलाय सगळ्यांनी लक्षात ठेवा,' असं नितेश राणे यांनी म्हटले. यावर त्यांचे बंधू आमदार निलेश राणे यांनी 'नितेशने जपून बोलावे' असा सल्ला दिला आहे. नितेश राणे भाजपमधून आमदार आहेत तर निलेश राणे शिंदेंच्या शिवसेनेतून आमदार आहेत.

"नितेशने जपून बोलावे, मी भेटल्यावर बोलेनच. पण, आपण बोलताना सगळ्या गोष्टींचे भान ठेवून बोलले पाहिजे. सभेत बोलणे सोपे आहे. पण, आपल्या बोलण्यामुळे आपण नेमके कोणाचा फायदा करतोय याचे भान असले पाहिजे. आपण महायुतीमध्ये आहोत हे विसरून चालणार नाही," असा सल्ला निलेश राणे यांनी दिला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवणारी एक बातमी सध्या जोर पकडत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या संभाव्य युतीसाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनी तर थेट गौप्यस्फोट करत, दोन्ही बंधू एकत्र येण्यासाठी 'मातोश्री'वर बैठक पार पडली असून, उद्धव ठाकरे यांनी युतीसाठी सकारात्मकता दर्शवली असल्याचे म्हटले आहे. या खुलाशामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या शक्यतेने नवी समीकरणे जुळण्याची चिन्हे दिसत आहेत.

# वैद्यकीय क्षेत्रातील नोकरीच्या आमिषाने वेश्या व्यवसायात ढकलले

मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी

वैद्यकीय क्षेत्रात नोकरी लावण्याचे आमीष दाखवून तीन बांगलादेशी महिलांना मुंबईत आणून त्यांना वेश्या व्यवसायात ढकल्याचा प्रकार घडला आहे. ओळख लवपण्यासाठी त्यांच्या नावाने बनावट आधारकार्डही तयार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी मालवणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. आरोपीने अशा प्रकारे किती महिलांची फसवणूक करून वेश्याव्यवसायात ढकलले? याबाबत पोलीस तपास करत आहेत.रुग्णालय, वैद्यकीय क्षेत्रात चांगली नोकरी देण्याचे आमीष दाखवून महिन्याभरापूर्वी या महिलांना बेकायदेशिररित्या भारत-बांगलादेश सीमेवरून घुसखोरी करून मुंबईत आणण्यात आले होते. त्याबाबतची माहिती मालवणी पोलिसांना मिळाली असता त्यांनी मालाड येथील मालवणी परिसरातील एनसीसी येथील एका घरावर छापा टाकला. त्यात तीन महिलांची सुटका करण्यात आली असून मन्सार अहमद मोहम्मद हसन शेख (५३) याला मालवणी पोलिसांनी अटक केली. तो मालाड येथील न्यू कलेक्टर कंपाउंड परिसरातील रहिवासी आहे. याप्रकरणी आकाश ऊर्फ शाहिन, संजीव ऊर्फ बच्चन व मेहंदी हसन या आरोपीचा शोध सुरू आहे. याप्रकरणी आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १४३ (३), १४४ (२) ३३६ (३), ३ (५) व अनैतिक व्यापार कायदा कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एम एम आर डी ए
MMRDA

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

प्रशासन विभाग, ८ वा मजला, कार्यालयीन नवीन इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पू.), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र.: ०२२-६५९६४०१६ • ई-मेल: sec@mailmmrda.maharashtra.gov.in
वेबसाईट: https://mmrda.maharashtra.gov.in

**ई-निविदा सूचना**

**कामाचे स्वरुप:** मुं. म. प्र. वि. प्राधिकरण, कार्यालयातील ८ कोनिका मिनोल्टा बिझहब C२५०i झेरॉक्स यंत्रांचा ५ वर्षांकरीता संपूर्ण सर्व्हिस व देखभाल करार करण्याकरीता कोनिका मिनोल्टा बिझहबच्या प्राधिकृत सेवापुरवठादारांकडून ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदेमध्ये नमूद असल्याप्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी स्वारस्य असलेल्या प्राधिकृत सेवा पुरवठादारांनी ई-निविदेव्दारे निविदा सादर करावी. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नविन कार्यालयीन इमारत, ८ वा मजला, वांद्रे-कुर्ला संकुल, मुंबई - ४०० ०५१ येथे संपर्क साधावा. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २३.०६.२०२५.

| अ. क्र. | को-या ई-निविदांची किंमत | अनामत रक्कम (रू.) | ई-निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी | | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | कामाची कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | तारीख/वेळ (पासून) | तारीख/वेळ (पर्यंत) | | |
| १ | रू. १,०००/- + GST | रू. २०,०००/- | ०९.०६.२०२५ (१८.०१ मिनिटे) | २३.०६.२०२५ (१८.०० वाजता) | २३.०६.२०२५ (१८.०० वाजता) | ५ वर्ष |

**टिप:** ई-निविदा https://mahatenders.gov.in/nicgep/app या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येईल. प्राधिकरणाच्या ई-निविदेबाबत सविस्तर माहिती आणि मदतीसाठी support-eproc@nic.in या ई-मेल किंवा दूरध्वनी क्र.०१२०-४००१ ००२, ०१२०-४००१ ००५ आणि ०१२०-६२७७ ७८७ येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी ०२२-६५९६४०००/७७०० आणि ०२२-६५९६४०१६ व ई-मेल sec@mailmmrda.maharashtra.gov.in वर संपर्क साधावा. कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार प्राधिकरणाने राखून ठेवला आहे. याबद्दलचा प्राधिकरणाचा निर्णय अंतिम व सर्व निविदाकारांना बंधनकारक राहील.

स्वाक्षरी/-
**सचिव,**
**कार्यकारी समिती (अ. का.), मुं. म. प्र. वि. प्राधिकरण**

**दिनांक :** ०९.०६.२०२५
**ठिकाण:** मुंबई.

**महाराष्ट्र शासन**
**इलाखा शहर विभाग,**
**(सा.बां.) ई-निविदा सुचना क्र. १७ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५/२२०१६९७७) हे सक्षम व अनुभवी कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | फोर्ट मुंबई येथील सेंट्रल टेलेग्राफ ऑफिस विस्तार इमारत १ आणि २ मजल्यावर स्टोरेज युनिट, टेबल्स, खुर्ची, फर्निचर आणि स्टोरेज रेक्स बसविणे. | रू. ९,५०,६४,९९३/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी-** दि. ९.६.२०२५ ते दि. १८.६.२०२५ पर्यंत.
**निविदा पूर्व बैठक -** दि. १२.६.२०२५
(बैठकिचे ठिकाण मुख्य अभियंता यांचे कार्यालय ४ बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ वेळ : ३.०० वाजता)
**ई-निविदा उघडणे-** दि. २०.६.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता

निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल. खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

1) www.mahapwd.com
2) http://mahatenders.gov.in

**जा.क्रं. इशवि/निलि/६२२३**
**कार्यकारी अभियंता**
**इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**२ रा मजला, बांधकाम भवन,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
**Email: presidency.ee@mahapwd.gov.in**
**दिनांक : ६/६/२०२५**

**सही/-**
**(व्ही. ए. पाटसकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**इलाखा शहर विभाग, मुंबई.**

**डी.जी.आय.पी.आर.आरओसी २०२५-२६/क्र-५/C१०४८**

महासागर



# श्री संत रोहिदास पायी दिंडीचे गेटवे ऑफ इंडिया येथून भव्य प्रस्थान

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

वारकरी परंपरेचा जागर करणाऱ्या श्री संत रोहिदास पायी दिंडी क्रमांक २४ चा भव्य प्रस्थान सोहळा आज गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथून भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. श्री पांडुरंग प्रतिष्ठान आणि श्री संत रोहिदास सेवा मंडळ, काळा किल्ला, धारावी यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे ही दिंडी पंढरपूरच्या दिशेने पायी प्रवासासाठी रवाना झाली.

ही दिंडी १९७८ साली संस्थापक ह.भ.प. पांडुरंग कारंडे महाराज (कराडकर) यांनी सुरू केली. यंदा या पंढरपूर वारीच्या ४८ व्या वर्षाचे औचित्य साधण्यात आले आहे. परंपरेने जोपासलेली ही आध्यात्मिक वारी आजही श्रद्धा, निष्ठा आणि भक्तिभावाने तेवढ्याच निष्ठेने पार पाडली जात आहे.

प्रस्थानप्रसंगी दिंडीप्रमुख ह.भ.प. चंद्रकांत कारंडे, पांडुरंग प्रतिष्ठानचे डॉ. शांताराम कारंडे, तसेच दिंडी अध्यक्ष ह.भ.प. नारायण पाटील महाराज यांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे राज्याचे रोजगार व कौशल्य मंत्री मा. मंगलप्रभात लोढा यांनी देखील या दिंडीस साक्षीदार होत उपस्थिती दर्शवली, यामुळे भक्तांमध्ये विशेष



उत्साह निर्माण झाला.

मुंबईतील विविध भागांतून आलेल्या शेकडो वारकरी भक्त टाळ-मृदुंगाच्या गजरात, "ज्ञानोबा-तुकाराम" च्या जयघोषात, विठूनामाच्या अभंगगायनात सहभागी होत पायी वारीस प्रारंभ केला.

दिंडीचा पहिला मुक्काम श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, वडाळा येथे झाला असून, पुढील मुक्काम अनुक्रमे धारावी काळा किल्ला, मानखुर्द, आणि वाशी येथील जागृत शिवमंदिर येथे असणार आहेत. एक महिन्याच्या या भक्तिमय प्रवासानंतर दिंडी आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी वाखरी येथे पोहोचणार आहे.

ऊन, वारा, पावसाचे आव्हान स्वीकारत, प्रेम, निष्ठा आणि समर्पणाने ही वारी पुढे सरकते. ही केवळ पायी वारी नाही, तर ती एक आध्यात्मिक चैतन्ययात्रा आहे. "पाऊले चालती पंढरीची वाट..." या गजरात आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या जयघोषात भक्त हरवून जातात.

श्री पांडुरंग प्रतिष्ठान यांच्या वतीने मुंबईतील सर्व भाविक भक्तांना या दिंडीत सहभागी होऊन अध्यात्मिक लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले होते.

## एजेएफसी वृत्तपत्र संघटनेचा राज्यस्तरीय कर्तव्यदक्ष नवरत्न शासकीय अधिकारी पुरस्कार सुनील आटपाडकर यांना प्रदान




**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

दैनिक लोकांकीत या वर्तमानपत्राच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड सर्कलच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तव्यदक्ष, सामाजिक बांधिलकी असणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय नवरत्न पुरस्कार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी देऊन सन्मानित करण्यात आले. एम.एम.आर.डी.एचे सामाजिक विभाग कक्ष या विभागाचे कर्तव्यदक्ष आणि सामाजिक बांधिलकी असलेले सहाय्यक सामाजिक विकास अधिकारी श्री. सुनिल दशरथ आटपाडकर यांना राज्यस्तरीय नवरत्न शासकीय अधिकारी हा पुरस्कार मुंबई मराठी पत्रकार संघाचे कार्यवाहक शैलेंद्र शिर्के सर, आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ पत्रकार जतिन देसाई सर आणि संस्थापक यासीन पटेल यांच्या हस्ते व उपस्थितीमध्ये देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर पुरस्कार श्री. आटपाडकर साहेबांनी मोलाची साथ असणाऱ्या पत्नीसोबत स्वीकारला. राज्यस्तरीय नवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. सुनील आटपाडकर साहेबांचे लेण्याद्री शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. मारुती पाचपुते साहेब, सचिव श्री. गणपतशेठ वाफारे, खजिनदार डॉ. शैलजा पाचप्ते मॅडम, संस्थेचे सर्व पदाधिकारी, संस्थेचे हितचिंतक कळस गावचे आदर्श सरपंच श्री. महादेव गाडगे साहेब आणि महात्मा फुले विद्यालयाच्या सर्व विभागांच्या वतीने मनापासून हृदयापर्यंत हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# पिन कोड नव्हे आता 'डीजी पिन'

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

कोणताही पत्ता पिन कोडशिवाय पूर्ण होत नाही, हा आग्रह आता इतिहासजमा झाला असून, भारतीय टपाल खात्याने 'डीजी पिन'चा पर्याय खुला करत भारतीयांसाठी डीजिटल पत्ते उपलब्ध करून दिले आहेत. यापुढे कोणताही टपाल व्यवहार डीजिटल पत्त्यांवरच डीजिटल पिनसह केला जाईल.

डीजी पिनचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आधीच्या पिनकोडमध्ये प्रचंड मोठा परिसर येत असे. म्हणजे, ४०० ७०५ म्हटल्यावर तो सानपाड्यातील कुठल्या एका घराचा पिनकोड नसतो तर संपूर्ण परिसराचा पिन कोड असतो. या पिनकोडवर असंख्य घरे असू शकतात. डीजी पिनचे तसे नाही. ही डीजी पिन दहा अंकी असेल आणि हा अंक फक्त तुमच्या घराचा किंवा कार्यालयाचा असेल. म्हणजे जितकी घरे तितके डीजी पिन तथा डीजिटल पिनकोड असतील.

केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर जावून तुम्ही तुमचा डीजी पिन मिळवू शकाल आणि शोधूदेखील शकाल. या डीजी पिनमुळे टपालापासून आपत्कालीन यंत्रणांपर्यंत तुमच्या पत्त्यावर नेमके पोहोचता येईल. ग्रामीण तथा वाडी वस्तींच्या परिसरात तर डीजी पिन फारच उपकारक ठरणार आहे.

### तुमचा डीजी पिन कसा शोधाल?

https://dac.indiapost.gov.in/mydigipin/home हे खास संकेतस्थळ केंद्राने तयार केले आहे. तुमच्या परिसरावर क्लीक केल्यानंतर तुमच्या घराचा किंवा कार्यालयाचा डीजी पिन तुम्ही शोधू शकाल. जीओ कोडेड डीजिटल अॅड्रेस सिस्टिम म्हणजेच डीजी पिन ही व्यवस्था हैदराबाद आयआयटीच्या सहकायनि विकसित करण्यात आली असून, एनआरएससी आणि इस्रोचेही सहकार्य घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे डीजी पीनची यंत्रणा ऑफलाईनदेखील उपलब्ध आहे.

## पेन्शनधारकाच्या वैद्यकीय खर्चाची संपूर्ण परतफेड करा

## मुंबई उच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आदेश

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेअंतर्गत (सीजीएचएस) पॅनेलमध्ये समाविष्ट रुग्णालयाने पेन्शनधारकाला आवश्यक उपचार दिले नाहीत. याची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मोठा झटका दिला आहे. २०१९ मध्ये खासगी रुग्णालयात हृदय प्रत्यारोपण झालेल्या पेन्शनधारकाच्या वैद्यकीय खर्चाची चार आठवड्यांत संपूर्ण परतफेड करा, असे निर्देश उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले.

सीजीएचएस पॅनेलमध्ये समाविष्ट रुग्णालयाने वैद्यकीय उपचाराची जबाबदारी झटकल्याचा आरोप करीत पेन्शनधारक अनिरुद्ध प्रतापराय नानसी यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. त्यांच्या याचिकेची

न्यायमूर्ती जी. एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत

सेठना यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली. पेन्शनधारकाला सरकारी रुग्णालयाने वैद्यकीय उपचार नाकारल्यामुळे खासगी रुग्णालयात जावे लागले. ही बाब खंडपीठाने अधोरेखित केली आणि केंद्र सरकारला नानसी यांच्या वैद्यकीय खर्चाची संपूर्ण परतफेड करण्याचे आदेश दिले. नानसी यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. अशा परिस्थितीत त्यांना खासगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागले होते. त्यांना खर्चाच्या पूर्ण परतफेडीपासून वंचित ठेवता येत नाही. आवश्यक उपचारांच्या अशा प्रकरणांमध्ये केंद्र सरकार परतफेड करण्यास बांधील असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले.

याचिकाकर्त्या पेन्शनधारक नानसी यांनी २००८ मध्ये केंद्र सरकारच्या सेवेतून स्वेच्छेने राजीनामा दिला होता. २००९ मध्ये त्यांना कार्डिओमायोपॅथीचे निदान झाले. पुढील दहा वर्षांत त्यांच्या हृदयाच्या डाव्या वेंट्रिकलचे कार्य १५ टक्क्यांपर्यंत बिघडले. त्याचा रक्तप्रवाहावर परिणाम झाला.

डॉक्टरांनी नानसी यांना तत्काळ हृदय प्रत्यारोपणाचा सल्ला दिला होता. परंतु, केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेअंतर्गत (सीजीएचएस) पॅनेलमध्ये समाविष्ट रुग्णालयाने हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यास नकार दिला. त्यामुळे नानसी यांनी सर एच. एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलमध्ये उपचार घेतले.

## फसवणूकप्रकरणी वॉण्टेड व्यावसायिक अटकेत

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

फसवणुकीच्या गुन्ह्यातील हरजीवन चंदूभाई कोळी नावाच्या एका वॉण्टेड व्यावसायिकाला मालाड पोलिसांनी अटक केली. डिलीव्हरी न केलेल्या स्टेशनरीच्या सुमारे ५७लाखांचा पेमेंटचा अपहार करून सुराणा हॉस्पिटलची फसवणूक केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. तो सध्या तो पोलीस कोठडीत असून त्याची चौकशी सुरु आहे.

मालाड येथे सुराणा हॉस्पिटल असून तिथे तक्रारदार अॅडमिन हेड म्हणून काम करतात. गेल्या तीन वर्षांत त्यांच्या हॉस्पिटलला अदगमा बिझनेस प्रायव्हेट लिमिटेड आणि भाविक इंटरप्रायजेस या दोन कंपनीचे संचालक व मालक हरजीवन कोळी आणि भावनाबेन कोळी यांनी काही स्टेशनरीच्या अर्ध्या मालाची डिलीव्हरी करून हॉस्पिटलचा कर्मचारी महेश डोलरिया याच्या संगनमताने त्यांना ५७ लाखांचे पेमेंट करण्यास प्रवृत्त केले. अशाच प्रकारे महेशने इतर काही कंपन्यासोबत संगनमत करून हॉस्पिटलची १ कोटी ८९ लाख रुपयांची फसवणूक केली. त्यातील एका कंपनीसोबत हॉस्पिटलचा कोणताही करार नसताना महेशला संबंधित कंपनीला पेमेंट देण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे तक्रारदाराने महेश डोलरिया याच्यासह इतर कंपनीच्या संचालकाविरुद्ध मालाड पोलिसांत तक्रार केली.

# शैक्षणिक दाखले, शपथपत्रासाठी स्टॅम्प पेपरची मागणी नियमबाह्य

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

शासकीय कार्यालयातील ई-सेवा केंद्रातून विविध शैक्षणिक दाखले तसेच न्यायालयातील प्रतिज्ञापत्रासाठी १०० व ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची करण्यात येणारी मागणी नियमबाह्य असल्याने यापुढे मागणी करण्यात येऊ नये, अशी तंबी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना पत्र लिहून दिली. राज्यातील सर्वच विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना हे पत्र जारी करण्यात आले आहे.

बावनकुळे यांनी या पत्रात म्हटले आहे की, विद्यार्थी, पालक, पक्षकार तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी दोन महिन्यांपूर्वी जातपडताळणी

**'हा निर्णय सामान्य माणसाच्या हिताचा आहे. २००४ पासून ही सवलत लागू आहे. वारंवार सरकारच्या वतीने याबाबत सांगण्यात येते. तरीही जिल्हा व तालुका प्रशासन याकडे दुर्लक्ष करणार असेल तर कारवाई केली जाईल. सर्वसामान्य जनतेला अकारण वेठीस धरणाऱ्यांना माफी नाही.'**

**चंद्रशेखर बावनकुळे,**
**महसूल मंत्री, महाराष्ट्र**

प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच न्यायालयासमोर दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी स्टॅम्प पेपर रद्द करण्यात आले आहेत.

शासकीय कार्यालये प्राणपत्रांसाठी आणि न्यायालयात सादर होणाऱ्या शपथपत्रासाठी आता स्टॅम्प पेपरची आवश्यकता नाही. साध्या कागदावर स्वयं प्रमाणित शपथपत्र सादर करणे पुरेसे आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना, विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना स्टॅम्प पेपरवरील खर्चातून मोठा दिलासा मिळत आहे. तथापि, काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने स्टॅम्प पेपरची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी कानाडोळा करणे सोडावे, जनतेला दिलासा द्यावा.

## बाबा सिद्दिकी हत्येतील आरोपी कॅनडात ताब्यात

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपी झिशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडातील सरे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार झिशान अख्तरला कॅनडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बनावट पासपोर्टच्या आधारे झिशान कॅनडात गेला होता. मुंबई पोलिस झिशान अख्तरला ताब्यात घेण्याची तयारी करत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या १२ ऑक्टोबर २०२४ ला झाली होती. झिशान सिद्दिकी याच्या कार्यालयाबाहेर रात्रीच्या वेळी बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार केला होता. लॉरेन्स बिश्नोई टोळीने बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी स्वीकारली होती. अभिनेता सलमान खानचे निकटवर्तीय असल्याने त्यांच्यावर गोळीबार केल्याचा दावा बिश्नोई टोळीकडून करण्यात आला होता. झिशान अख्तर हा जालंधरच रहिवासी आहे. बाबा सिद्दिकींवर गोळीबार झाला तेव्हा तो घटनास्थळी होता. त्यानंतर तो भारत सोडून पळून गेल्याचे समोर आले आहे. यासाठी झिशान अख्तरने पाकिस्तानातील अंडरवर्ल्डमधील शहझाद भट्टीची मदत घेतल्याची माहिती आहे. भट्टी हा फारुक खोखर गँगचा सदस्य आहे. अख्तरने २०२५ च्या सुरुवातीला एक व्हिडीओ जारी केला होता. त्यामध्ये त्याने बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात आणि भारतातील इतर गुन्हेगारी घटनांमध्ये सहभागी असल्याचे म्हटले होते.

# एसटीच्या जागांचा 'पीपीपी' मॉडेलवर विकास

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीच्या महत्त्वाच्या जागांचा पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) पद्धतीने विकास करून उत्पन्नाचे स्थायी स्रोत निर्माण करण्याचे स्पष्ट संकेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. मुंबईतील एस.टी. महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या विशेष बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, "राज्यातील शहरांमध्ये एसटी बसस्थानक व आगार परिसरात मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध आहेत. या जागा केवळ तशाच न राहता, त्यांचा नियोजनबद्ध विकास केल्यास महामंडळासाठी उत्पन्नवाढीचा मोठा मार्ग खुला होईल."

या बैठकीला महामंडळाचे महाव्यवस्थापक (स्थापत्य) दिनेश महाजन, तसेच वास्तुविशारद लहीवाल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील विविध प्रकारच्या जागांचा समावेश करत अ, ब, आणि क असे तीन स्तरांमध्ये वर्गीकरण केले जाणार आहे. यामध्ये शहरी, निमशहरी आणि ग्रामीण परिसरातील एसटी मालकीच्या जागांचा समावेश करण्यात येणार आहे.

"प्रत्येक पॅकेजमध्ये त्या-त्या पायाभूत सुविधांचे मूल्यांकन करून, त्याच पॅकेजमध्ये आवश्यक ती सुधारणा करता येईल. एकूण ७२ पॅकेजेस तयार करून या माध्यमातून राज्यातील अनेक बसस्थानक आणि आगारांचा आधुनिकतेकडे प्रवास घडवून आणणार आहोत," असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

### तातडीने कामाला गती द्या

या प्रकल्पांना लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनी तातडीने निर्णय घेण्याचे आणि प्रक्रियेची गती वाढवण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. स्थानिक परिस्थिती, संभाव्य व्यवसायिक लाभ, तसेच सार्वजनिक सोयी लक्षात घेऊन सर्व नियोजन करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेल्या एस.टी. महामंडळाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पीपीपी मॉडेलचा अवलंब हे एक दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे. या माध्यमातून जुन्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण, उत्पन्नवाढ आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा या तिन्ही आघाड्यांवर सकारात्मक बदल अपेक्षित आहे.

## बंदी असताना ड्रोनद्वारे अंधेरीत चित्रीकरण, गुन्हा दाखल

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

बंदी असतानाही ड्रोन कॅमेऱ्याद्वारे अंधेरीत चित्रिकरण करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी ड्रोन चालकासह तिघाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' नंतर खबरदारी म्हणून सर्वच शहरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार ड्रोन, एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर आदी साधनांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सिनोव्हेटीव्ह कंपनीत मोहम्मद सनी (२७) ड्रोन ऑपरेटर म्हणून काम करतो. त्याच्या कंपनीला एलीगंट बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स कंपनीने चित्रिकरणाचे काम दिले होते. कंपनीचे अन्य कर्मचारी स्वप्नील देसाई (३२) सोनुकुमार रॉय (२६) घटनास्थळ दाखवण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी तेथे हजर होते. पोलिसांनी ड्रोन साहित्य जप्त केले आहेत.

# वारीच्या वाटेवर वीष नको, भक्तीचा प्रसादच द्या!

# मंत्री झिरवळांचा भेसळखोरांना इशारा

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या धार्मिक श्रद्धेचं सर्वोच्च प्रतीक – लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने पायी निघतात, भक्तीचा जयघोष करतात. पण या भक्तीच्या प्रवासात वारकऱ्यांच्या ताटात 'भक्तीऐवजी भेसळ' पडू नये, यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी थेट मैदानात उतरून भेसळमुक्त अन्न मोहिमेला सुरुवात केली आहे.

वारी हा केवळ भक्तिभावाचा प्रवास नसून, जनजागृतीचा महोत्सवही आहे. "वारी ही भेसळीच्या विरोधात लढण्याचीही एक संधी आहे," असे सांगत मंत्री झिरवळ यांनी यंदाच्या वारीत फूड सेफटी व्हॅन, भेसळ चाचणी मोहिमा आणि जनजागृती कीर्तने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. "वारकऱ्यांच्या ताटात विष नको! सकस, भेसळमुक्त अन्नच पुरवा!" – झिरवळ यांचा स्पष्ट इशारा

वारी मार्गावर अन्न वाटप करणाऱ्या संस्था, सेवाभावी मंडळे, अन्नछत्रे यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. तेल, तूप, दूध यामध्ये भेसळ होणार नाही याची कसून तपासणी केली जाईल. यासाठी फूड सेफटी व्हॅन देखील प्रत्येक मुख्य वारी मार्गावर तैनात केली जाणार आहे.

या वर्षी पहिल्यांदाच कीर्तन, प्रवचनांमधून अन्नभेसळीविरोधातील जागृती केली जाणार आहे. कीर्तनकार, भजनी मंडळे यांना यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "वारी फक्त भक्तीसाठी नाही, तर आरोग्यासाठीही असावी," असा मंत्र झिरवळ यांनी दिला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना झिरवळ यांनी खात्याच्या मर्यादाही मोकळेपणाने मांडल्या. "आमच्या खात्याला इतर खात्यांच्या तुलनेत कमी निधी मिळतो. अनेक निर्णयांसाठी केंद्राच्या परवानगीची आवश्यकता असते, त्यामुळे हालचाली मर्यादित होतात," असे त्यांनी सांगितले.

मंत्री झिरवळ म्हणाले, "वारीला येणारे भाविक हे ईश्वरभक्तीने प्रेरित होतात. त्यांचं आरोग्य बिघडू नये, म्हणून अन्न पुरवठादारांनी विशेष काळजी घ्यावी. भाविकांच्या ताटात केवळ अन्न नाही, तर आपल्या निष्ठेचा प्रसादही असतो. त्यामुळे भेसळीला आता शून्य सहनशीलता ठेवणार आहोत."

वारीच्या निमित्ताने मंत्री झिरवळ यांचा 'भेसळमुक्त अन्न' मोहिमेसाठी घेतलेला पुढाकार केवळ प्रशासकीय नव्हे, तर एक सामाजिक आणि भावनिक बांधिलकीचं प्रतीक आहे. आता भाविकांची अपेक्षा फक्त विठ्ठलाच्या दर्शनाचीच नाही, तर स्वच्छ, सुरक्षित आणि श्रद्धायुक्त अन्नाचीही आहे. वारी मार्गावर भेसळ नव्हे, तर भक्तीचा प्रसादच वाटावा – हीच या मोहिमेची खरी यशोगाथा ठरेल.

## महत्त्वाच्या बातम्या

### १३ जूनपर्यंत अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट'

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

राज्यात मान्सूनच्या पावसाने जोर धरला असून, हवामान विभागाने ८ ते १३ जून या कालावधीसाठी बहुतांश जिल्ह्यांना 'यलो अलर्ट जारी केला आहे. रायगड, रुपागिरी, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, बुलडाणा, गडचिरोली, वर्षा, वाशिम आणि यवतमाळ, है 'यलो अलर्ट' जारी झालेले जिल्हे आहेत. सुरुवातीला ९ जूनपर्यंत पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र आता हा मुक्काम १३ जूनपर्यंत वाढवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, १० जूनपासून मान्सून मुंबई आणि पुण्यातील मुक्काम संपवून राज्याच्या इतर भागांमध्ये सक्रिय होण्याची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या सर्वच विभागांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### कोरोनाचे राज्यात ८६, तर मुंबईत २८ रुग्ण

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसषिक्षा कोरोना रुग्णांत किंचित घट झालेली आहे. राज्यात शनिवारी ८६ रुग्ण आढळून आले आहेत. मुंबईमध्ये २८ रूग्ण आढळले. राज्यात आढळलेल्या रुग्णांपैकी मुंबई २८, ठाणे मनपा ०६, मीरा-भाईंदर २, पुणे-२, पुणे मनपा ३९, पिंपरी-चिचवड मनपा ७, सातारा -१. कोल्हापूर मनपा १, सांगली १, छ. संभाजीनगर मनपा-४, नागपूर मनपा-३ सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, सर्व रुग्ण सौम्य लक्षणांसह असून त्यांच्यावर नियमित उपचार सुरू आहेत. सध्या राज्यात एकूण ५९५ सक्रिय रूण उपचार घेत आहेत. जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत राज्यात १६२२६ कोविड चाचण्या करण्यात आल्या असून त्यामध्ये १३६२ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले आहेत. यापैकी ७४९ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. मुंबईमध्ये जानेवारीपासून आतापर्यंत एकूण ६४० रुग्ण आढळले आहेत.

### कांदिवलीत पाच वर्षांच्या दोन मुलींचा विनयभंग; सुरक्षारक्षकाला अटक

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

मैत्रिणीसोबत खेळणाऱ्या पाच वर्षांच्या दोन अल्पवयीन मुलींना नकोसा स्पर्श करुन विनयभंग केल्याप्रकरणी ५९ वर्षीय सुरक्षारक्षकाला समतानगर पोलिसांनी अटक केली. आरोपीविरुद्ध विनयभंगासह पोक्सो कलमांतर्गत कारवाई करण्यात आली असून याच गुन्ह्यात त्याला दिडोंशीतील विशेष सत्र न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. कांदिवलीतील पोईसर परिसरात तक्रारदार महिला तिच्या कुटुंबियांसोबत राहते. तिची मुलगी मैत्रिणींसोबत नियमित जवळच्या मैदानात खेळण्यासाठी जात होती. तिथेच आरोपी सुरक्षारक्षक म्हणून काम करत होता. २५ मे रोजी त्याने तक्रारदाराच्या मैत्रिणीच्या मुलीचा तर २९ मेला तिच्या मुलीशी अश्लील लगट करून त्यांना नकोसा स्पर्श केला होता. दोन दिवसांपूर्वी या मुलींच्या आईला सुरक्षारक्षक त्यांच्या मुलींशी अश्लील चाळे करत असल्याचे समजले. त्यानंतर त्यांनी समतानगर पोलिसांत तक्रार केली होती.

### तीन बांगलादेशी नागरिकांना शिक्षा

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

मुंबईत अनधिकृतपणे वास्तव्यास असलेल्या दोन महिलांसह तीन बांगलादेशी नागरिकांना बोरिवलीतील स्थानिक न्यायालयाने साध्या कारावासासह पाचशे रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. शिक्षा भोगल्यानंतर त्यांना बांगलादेशात पाठविण्याचे आदेश न्यायालयाने कुरार पोलिसांना दिले.

मालाड परिसरात काही बांगलादेशी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती मिळाल्यानंतर कुरार पोलिसांनी जानेवारी महिन्यात मालाड येथील कुरारगाव परिसरात एका व्यक्तीला अटक केली होती. त्याच्या चौकशीनंतर दोन महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. चौकशीत ते बांगलादेशी नागरिक असल्याचे उघडकीस आले होते.

बांगलादेशातील उपासमारीसह बेरोजगारीला कंटाळून तिघेही भारतात पळून आले होते. तेव्हापासून ते मालाड परिसरात अनधिकृतपणे वास्तव्यास होते. अटकेनंतर या तिघांविरुद्ध बोरिवलीतील स्थानिक न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले होते.

### ९८ लाखांचे हिरे घेऊन पलायन

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

सुमारे ९८ लाख रुपयांचे हिरे घेऊन पलक नवीनचंद्र मेहता या हिरे व्यापाऱ्याने पलायन केल्याची घटना वांद्रे परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी बीकेसी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद करुन पळून गेलेल्या आरोपीचा शोध सुरु केला आहे. यातील तक्रारदार कुटुंबियांसोबत विलेपार्ले येथे राहतात. त्यांची वांद्रेतील बीकेसी, भारत डायमंड बोर्समध्ये एक खासगी कंपनी आहे. एप्रिल महिन्यात तक्रारदाराच्या परिचित हिरे व्यापाऱ्याने त्यांची पलक मेहताशी ओळख करुन दिली होती. एप्रिल महिन्यात त्यांच्याकडून पलकने क्रेडीटवर ९८ लाखांचे हिरे विक्रीसाठी घेतले होते. मात्र पैसे न देता त्याने या हिऱ्यांची इतर व्यापाऱ्यांना परस्पर विक्री करुन त्यांची फसवणूक केली होती.

### वांद्रेत रस्ता ओलांडताना एकाचा मृत्यू

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

वांद्रे येथील पश्चिम दुतग्रती महामार्ग, कार्डिनल स्कूलसमोरील उत्तर वाहिनीवर मंगळवारी ३ जूनला रात्री रस्ता ओलांडताना एका अज्ञात व्यक्तीचा अपघात झाला. पोलिसांनी जखमी झालेल्या व्यक्तीला तातडीने जवळच्या भाभा रुग्णालयात दाखल केले. तिथे त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले होते. मृत व्यक्तीची ओळख पटली नसून त्याची ओळख पटविण्याचे पोलिसांचे प्रयत्न सुरु आहेत. याप्रकरणी आरोपी वाहनचालकाविरुद्ध खेरवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर तो पळून गेल्याने त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. मृत व्यक्तीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.

### आरे कॉलनीतील रस्त्याला पुन्हा तडे

**मुंबई, दि. ८ प्रतिनिधी**

आरेतील बीएमसी वर्कर्स कॉलनी परिसरात नव्याने बनवलेल्या काँक्रीट रस्त्यावर पुन्हा तडे गेल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, हा रस्ता अवघ्या वर्षभरापूर्वीच बांधण्यात आला होता. याच रस्त्यावर २०२५ च्या सुरुवातीला काही भाग पुन्हा खोदून दुरुस्त केला गेला होता. आता पुन्हा तडे गेल्याने, कामाच्या दर्जावर मोठे प्रश्न उपस्थित झाले आहेत. या रस्त्यावर सध्या पुन्हा दुरुस्ती सुरू असून, प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. एवढेच नव्हे, तर दुरुस्तीवेळी उखडलेला मलबा थेट रस्त्यालगतच्या आरे जंगल परिसरात टाकण्यात आला आहे. हा भाग पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. त्यामुळे असा मलबा टाकणे हे पर्यावरणविषयक नियमांचे सरळ उल्लंघन असल्याची टीका होत आहे. स्थानिक नागरिक आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

